**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.**

**मा.स्थायी समिती**

**कार्यपत्रिका क्रमांक – ६३**

**(सभावृत्तांत)**

दिनांक – १६/०५/२०१८ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक १६/०५/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.ममता विनायक गायकवाड - सभापती
२. मा.राजू मिसाळ
३. मा.अमित राजेंद्र गावडे
४. मा.गावडे राजेंद्र तानाजी
५. मा.आंगोळकर सागर सुनिल
६. मा.करुणा शेखर चिंचवडे
७. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
८. मा.गीता सुशिल मंचरकर
९. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
१०. मा.लांडगे सारिका संतोष
११. मा.बोईनवाड यशोदा प्रकाश
१२. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१३. मा.बारणे अर्चना तानाजी

याशिवाय मा.आष्टीकर - अतिरिक्त आयुक्त (१), मा.गावडे - अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण - शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.साळवे – अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर - उपसंचालक नगररचना, मा.लांडे - मुख्यलेखापाल, मा.पाटील मा.दुधेकर - सहशहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.लोणकर, मा.बोदडे, मा.खोराटे, मा.झगडे, मा.राऊत, मा.चितळे, मा.कापडणीस - सहाय्यक आयुक्त, मा.पवार -प्र.कायदा सल्लागार, मा.साळुंके - मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील – प्रचार्य, औ.प्र.कें., मा.आवारी - प्रशासन अधिकारी, मा.पोमन – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.सवणे, मा.तांबे, मा.चव्हाण, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.घोडे, मा.कांबळे, मा.ओंभासे, मा. गट्टुवार, मा.पुजारी, मा.गायकवाड, मा.भोसले, मा.मोरे, मा.घुबे, मा.देशमुख, मा.पवार, मा.भोजने - कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे - पशुवैद्यकीय अधिकारी, मा.जगताप-कामगार कल्याण अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –</u>**

विषय क्रमांक १८) मनपाचे अधिकारी/ विभागप्रमुख/ अभियंते व विविध कार्यालय यांस कार्यलयीन कामकाजासाठी 3G/4G डौंगल सुविधा पुरविणे...

विषय क्रमांक १९) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकातील ब क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाच्या कामांसाठी तरतूद उपलब्ध करून देणेबाबत...

विषय क्रमांक २०) यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयातील एकत्रीत मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात ६ महिने करिता विविध कन्सलटंट पदांवर नियुक्ती दिलेल्या उमेदवारांची यादी मान्यतेकामी ठेवणे बाबत...

विषय क्रमांक २१) अ प्रभागांतर्गत उंच पाण्याच्या टाक्यांवरून पाणीपुरवठा व्यवस्थापन करणेकरिता मजूर कर्मचारी पुरविणे (२०१६-१७) या कामाचे सुधारित खर्चास मान्यता व मुदतवाढ मिळणे बाबत...

विषय क्रमांक २२) कृष्णानगर संप व पंप हाऊस व इतर ठिकठिकाणी व्हॉल्व्ह व ऑपरेशन करिता उंच पाण्याच्या टाक्यांवरून पाणीपुरवठा व्यवस्थापन करणेकरिता मजूर कर्मचारी पुरविणे (२०१६-१७) या कामाचे सुधारित खर्चास मान्यता व मुदतवाढ मिळणे बाबत...

विषय क्रमांक २३) कै.मा.ना.यशवंतरावजी चव्हाण स्मारक समितीस देणगी देणेबाबत – मा.गावडे राजेंद्र तानाजी, मा.राजू मिसाळ यांचा प्रस्ताव

विषय क्रमांक २४) फोर कलर मध्ये निमंत्रण पत्रिका न छापणेबाबत व स्मृतीचिन्ह न देणेबाबत - मा.विलास मडिगेरी, मा.अमित गावडे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक २५) पिंपरी भाजीमंडई येथील इमारतीमधील जुने रात्र निवारा केंद्र वाढविणे व देखभाल दुरूस्ती करणेकामी वास्तुविशारद (Architect) नेमणेबाबत....

विषय क्रमांक २६) केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय व सहकारीता मंत्राल्याच्या सहयोगाने व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने पिंपरी चिंचवड शहरातील दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांच्या मोफत वाटप कार्यक्रमाचे आयोजनकामी येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत...

--------

दिनांक ०९/०५/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ६२) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------

ठराव क्रमांक - २६५० | विषय क्रमांक - १

दिनांक – १६/०५/२०१८ | विभाग- क मुख्यालय, स्थापत्य

सूचक – मा.करूणा चिंचवडे | अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ– मा. महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/क-मुख्य/११३/१८ दि.५/५/२०१८

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.**90/1/2017-18** अन्वये प्रभाग क्र.३९ संत तुकारामनगर मधील वाय सी एम हॉस्पिटल मधील आय.सी.यु. व ओटी रिनोव्हेशनची उर्वरित कामे करणेकामी मे.ए.आर.नायडू नि.र.रू.**1,17,77,323/-** (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी सतरा लाख सत्याहत्तर हजार तीनशे तेवीस फक्त) पेक्षा **12.65%** कमी दराने प्राप्त झालेली आहे. सन २०१७-१८ चे एस.एस.आर. दरानुसार प्राप्त निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा **21.46%** कमी येत असल्याने प्राप्त निविदा मंजूर दराने र.रू.**1,02,87,492/-** पर्यंत काम करून घेणेस आणि त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६५१ विषय क्रमांक - २
दिनांक – १६/०५/२०१८ विभाग- ब मुख्यालय, स्थापत्य
सूचक – मा.सारीका लांडगे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ– मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/ब-मुख्य/३५६/१८ दि.५/५/२०१८

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.**95/2/2017-18** अन्वये विकास प्राधिकरण हद्दीतील पेठ क्र.३२ येथे वायू प्रदूषण नियंत्रण यंत्रणेसह गॅसवर आधारित आधुनिक शवदाहिनी सह स्मशानभुमी विकसीत करणेकामी मे. बी. के. खोसे नि.र.रू.**4,62,00,483/-** (अक्षरी रक्कम रुपये चार कोटी बासष्ठ लाख चारशे त्र्याऐंशी फक्त) पेक्षा **3.75%** जादा दराने प्राप्त झालेली आहे. सन २०१७-१८ चे एस.एस.आर. दरानुसार प्राप्त निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा **7.66%** ने कमी येत असल्याने प्राप्त निविदा मंजूर दराने र.रू.**4,79,33,001/-** पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६५२ विषय क्रमांक - ३
दिनांक – १६/०५/२०१८ विभाग- झोनिपु स्थापत्य
सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ– मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/ २३७/२०१८ दि.०२/५/२०१८

मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (०१ ते ०६) मधील कामाचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे भाववाढ कलम लागू असल्यास, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस

अधिन राहून संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६५३ | विषय क्रमांक - ४

दिनांक – १६/०५/२०१८ | विभाग- मुख्य लेखा परिक्षण

सूचक – मा.राजेंद्र गावडे | अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ– मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/८९/२०१८ दि.०३/५/२०१८

मा. मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.०९/०४/२०१८ ते दि.१५/०४/२०१८ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/८९/२०१८ दि.०३/०५/२०१८ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६५४ | विषय क्रमांक - ५

दिनांक – १६/०५/२०१८ | विभाग- माहिती व तंत्रज्ञान

सूचक – मा.विलास मेडिगेरी | अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मातंवि/६/कावि/१७२/२०१८ दि.०७/५/२०१८

विषय – NIC यांचेकडील ई-निविदा संगणक प्रणालीचा वापर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये करणेबाबत...

विषय क्रमांक ५ चा विचार दि.३०/०५/२०१८ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६५५ | विषय क्रमांक - ६

दिनांक – १६/०५/२०१८ | विभाग- पाणीपुरवठा

सूचक – मा.प्रज्ञा खानोलकर | अनुमोदक – मा.सारिका लांडगे

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/१३३०/२०१८ दि.०८/५/२०१८

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.नो.क्र.३१/२/२०१७-१८ अन्वये सन २०१७-१८ करिता प्रभाग क्र.४४ आणि ४५ मध्ये जुन्या पाईपलाईन बदलून नवीन पाईपलाईन टाकणेकामी मे.डी.एम.एंटरप्रायझेस निविदा रक्कम रू.३०,८१,२०४/- (अक्षरी र.रू. तीस लाख एक्याऐंशी हजर दोनशे चार फक्त) पेक्षा २०.२२% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.२४,५८,१८४/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक

दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६५६ विषय क्रमांक - ७

दिनांक – १६/०५/२०१८ विभाग- मुख्य लेखा परिक्षण

सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ– मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/८८/२०१८ दि.०३/५/२०१८

मा. मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.०२/०४/२०१८ ते दि.०८/०४/२०१८ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/८८/२०१८ दि.०३/०५/२०१८ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६५७ विषय क्रमांक - ८

दिनांक – १६/०५/२०१८ विभाग- लेखा

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विलास मडिगेरी

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/३/कावि/१३८/२०१८ दि.०८/५/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.सह व्यवस्थापकीय संचालक यांचे कडील पत्र क्रं.पी.एम.पी.एम.एल./मुलेविअ/५०१ दि.०४/०५/२०१८ अन्वये सन २०१८-१९ ची अंदाजीत संचलनतूट र.रू.२०३.९० कोटी गृहीत धरून **४०%** नुसार पिंपरी चिंचवड मनपाचा संचलन तूटीचा हिस्सा ८१.५६ कोटी व विविध प्रकारचे पासेसच्या अनुदाना पोटी सन २०१८-१९ साठी मागणी र.रू.२३.५० कोटी राहील असे नमूद केले असून माहे मे २०१८ पर्यंत अनुक्रमे प्रतिमहा र.रू.६.८० कोटी दरमहा संचलनतूट अग्रीम स्वरूपात द्यावी तसेच दरमहा सवलतीचे पासेस पोटी र.रु.१.९६ कोटी असे एकूण र.रु.८.७६ कोटी, अग्रीम स्वरुपात द्यावी अशी विनंती केली आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकात पीएमपीएमएल निधी या लेखाशिर्षावर र.रु.१६४.५६ कोटी (अक्षरी र.रु.एकशे चौसष्ट कोटी छपन्न लाख) फक्त तरतूद करणेत आली असून यामध्ये संचलनतूट ८१.५६ कोटी विविध प्रकारचे पासेस र.रु.२३ कोटी व बसेस खरेदी र.रु.६० कोटी असा अपेक्षित खर्च गृहीत धरण्यात आलेला आहे. सदर रकमेतून मे २०१८ ची रक्कम रुपये ६ कोटी संचलनतूट व सवलतीचे पासेसपोटी र.रु.१.५० कोटी असे एकूण र.रु.७.५० कोटी (अक्षरी र.रु. सात कोटी पन्नास लाख) फक्त याप्रमाणे माहे मे २०१८ अखेर ०१ महिन्याची अग्रीम स्वरुपात अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६५८ विषय क्रमांक - ९
दिनांक – १६/०५/२०१८ विभाग- स्थापत्य
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.विलास मेडिगेरी
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/शअ/तां/४/९२/२०१८ दि.०९/५/२०१८

विषय – महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना रस्ता खोदाई करणेस परवानगी देणेबाबत...

विषय क्रमांक ९ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६५९ विषय क्रमांक - १०
दिनांक – १६/०५/२०१८ विभाग- वाय.सी.एम.एच.
सूचक – मा.यशोदा बोईनवाड अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/७/कावि/२७४/२०१८ दि.१०/०५/२०१८

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयामध्ये दरमहा एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात त्वचा व गुप्तरोग तज्ञ हे पद सहा महिने कालावधीकरीता भरणेकामी वर्तमानपत्रात व मनपा वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करून प्राप्त उमेदवराच्या मुलाखती घेणेत आल्या आहेत. त्यामध्ये पात्र डॉ. नचिकेत मधुकर पळसकर यांची उक्त आदेशाचे तारखेपासून सहा महिने कालावधीसाठी तात्पुरत्या/ हंगामी स्वरूपात र.रू.६०,०००/- प्र.महिना एकत्रित मानधनावर नेमणुक देणेत आली असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६६० विषय क्रमांक - ११
दिनांक – १६/०५/२०१८ विभाग- वाय.सी.एम.एच.
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.सारिका लांडगे
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/७/कावि/२७५/२०१८ दि.९/०५/२०१८

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयातील तात्पुरत्या/हंगामी स्वरूपात नेमलेल्या लॅब टेक्निशियन यांचे मानधनातील तफावत दुर/वाढ खाली नमुद केलेले तीन लॅब टेक्निशनय यांच्या मानधनात अनुभवानुसार खालील प्रमाणे दुरूस्ती/वाढ करून सुधारीत मानधन अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र | मानधनात वाढ/दुरूस्ती करावयाचे लॅब टेक्निशियन यांची नावे | ९/०१/१४ चे नेमणुक आदेशात नमुद केलेला अनुभव | ९/१/१४ चे आदेशा नुसार दिलेले मानधन र.रू | जाहिरातीनुसार दि.०२/०१/१४ रोजी सादर केलेला अर्ज व अनुभव नुसार धरावयाचे अधिकृत ग्राह्य अनुभव | अधिकृत ग्राह्य अनुभवानुसार दि.०९/०१/१४ पासून ते दि.०८/०२/१५ अखेर द्यावयाचे मानधन र.रू | मा.आयुक्त सो यांचे दि.०९/०२/२०१५ चे आदेशानुसार अधिकृत ग्राह्य अनुभवानुसार दि.०९/०२/१५ पासून ते आज अखेर द्यावयाचे मानधन र.रू. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | श्रीम.मयुरी बाबु भालेराव | ४ वर्ष | १३०००/- | ५ वर्ष ८ महिने | १५०००/- | १७०००/- |
| २ | श्रीम.ज्योती किशोर कांबळे | ४ वर्ष | १३०००/- | ५ वर्ष ४ महिने | १५०००/- | १७०००/- |
| ३ | श्रीम.स्मिता शरद पिंपरे | ३ वर्ष | १००००/- | ५ वर्ष ३ महिने | १५०००/- | १७०००/- |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६६१ | विषय क्रमांक - १२

दिनांक – १६/०५/२०१८ | विभाग- क क्षेत्रिय कार्यालय

सूचक – मा.सागर आंगोळकर | अनुमोदक – मा.विलास मेडिगेरी

संदर्भ– मा.आरोग्य कार्यकारी अधिकारी यांचे जावक क्र.कक्षे/आ१५/कावि/२०७/२०१८ दि.०५/५/२०१८

विषय – क क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील घरोघरचा कचरा गोळा संकलन करणे व वाहतुक करणे कामासाठी वाढीव २ ट्रक वाहने उपलब्ध करून देणेबाबत

विषय क्रमांक १२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६६२ | विषय क्रमांक - १३

दिनांक – १६/०५/२०१८ | विभाग- ई क्षेत्रिय कार्यालय

सूचक – मा.विलास मडिगेरी | अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ– मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.श्रीभैवा/५/कावि/२८/२०१८ दि.९/०५/२०१८

मा. क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

इ क्षेत्रीय कार्यालया मार्फत श्री भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय, करीता कोटेशन नोटीस क्र.1 जा.क्र.भैसावा/कावि/0८/२०१८, दि.12/03/2018 अन्वये प्रसिध्द करून प्रस्तावा सोबतचे प्रपत्र अ नुसार दरपत्रक मागविले असता 3 पुरवठा धारकांकडुन कोटेशन प्राप्त झाले असून अक्षरविश्व बुक डिलर्स, गणेश पुरम अपार्टमेंट समोर, सासवड यांनी 25% सुट दिली आहे. श्री भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय, भोसरी या शासन अनुदान प्राप्त वाचनालयाकरिता 298 पैकी 158 पुस्तकांचा अक्षरविश्व बुक डिलर्स, गणेश पुरम अपार्टमेंट समोर, सासवड यांनी पुरवठा केला असुन इकडील आदेश क्र. श्रीभैसावा/05/कावि/18/2018 दि.26/03/2018 अन्वये र.रु.25,274/- अदा करण्यात आला आहे. तरी अक्षरविश्व बुक डिलर्स, गणेश पुरम अपार्टमेंट समोर, सासवड यांचेकडून प्राप्त झालेल्या लघुत्तम

दराप्रमाणे श्री भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय, भोसरी करीता 158 पुस्तकांच्या छापिल किमतीवर 25% सुट देवून र.रू.25,274/- (अक्षरी र.रू.पंचवीस हजार दोनशे चौ-याहत्तर फक्त) ची पुस्तके खरेदी केलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६६३ विषय क्रमांक - १४
दिनांक – १६/०५/२०१८ विभाग- पर्यावरण अभियांत्रिकी
सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ– मा.सह शहर अभियंता (पर्यावरण) यांचे जावक क्र.पअक/१/कावि/१२९/२०१८ दि.११/०५/२०१८

मा. सह शहर अभियंता (पर्यावरण) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.ENV18/1-2017-18 अन्वये मैलाशुध्दीकरण केंद्र व पंपीग स्टेशन मध्ये आवश्यक क्षमतेचे व्हाईस्ट बसविणे व इतर अनुषंगीक कामे करणेकामी मे.प्लोमॅक इंजिनिअरिंग कार्पोरेशन यांचेकडुन नि.र.रु.११,९६,६६१/- (अक्षरी र.रू.अकरा लाख शहाण्णव हजार सहाशे एकसष्ठ फक्त) पेक्षा -१२.९०% कमी या सुधारित दराने प्राप्त झालेली आहे. निविदा स्विकृती योग्य दरापेक्षा -१८.६१% ने कमी येत असल्याने प्राप्त सुधारित दराने र.रु.१०,४२,२९२/- पर्यंत काम करुन घेणेकामी त्यांचेबरोबर करारनामा करुन कामाचे आदेश देण्यात आले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६६४ विषय क्रमांक - १५
दिनांक – १६/०५/२०१८ विभाग- ह क्षेत्रिय कार्यालय
सूचक – मा.करूणा चिंचवडे अनुमोदक – मा.सारिका लांडगे
संदर्भ– मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.हक्षेका/आरोग्य/कावि/१२३/१८ दि.९/०५/२०१८

मा. क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मागविलेल्या ह प्रभाग आरोग्य नि.नो.क्र.1/2017-18 अन्वये ह क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील संपूर्ण परिसरात औष्णिक धुरीकरण कामकाज करण्यासाठी आवश्यक 4 डिझेल रिक्षा टेम्पो (वाहनचालकासह) भाडयाने घेणेबाबतनिविदा प्रसिध्द केले असता प्राप्त झालेल्या निविदांपैकी मे.श्री.संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था नि.र.रू.9,06,620/- (अक्षरी र.रू.नऊ लाख सहा हजार सहाशे वीस फक्त) -1.50% कमी दराने या ठेकेदारास करारनामा करुन कामाचा आदेश देण्यात आलेले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६६५ विषय क्रमांक - १६

दिनांक – १६/०५/२०१८ विभाग- नागरवस्ती विकास योजना

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नावियो/१/कावि/३२७/२०१८ दि.११/०५/२०१८

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागा मार्फत विविध कल्याणकारी योजना राबविणेत येतात. या योजनांची वस्ती पातळीवर प्रभावीपणे अंमलबजावणी होणेसाठी, MSW अर्हताप्राप्त ११ समुह संघटकांची तात्पुरत्या स्वरूपात ६ महिने कालावधीसाठी मानधन तत्वावर नेमणूक करणेत आली आहे. त्यापैकी ५ समुहसंघटकांची तात्पुरत्या स्वरूपात केलेली नेमणूकीची मुदत दिनांक ९/४/२०१८ रोजी संपत असल्याने आदेशाचे तारखेपासुन अथवा प्रत्यक्ष रूजू तारखेपासून ६ महिने कालावधीसाठी प्रस्तावात नमूद केलेल्या ५ समुहसंघटकांना मुदत वाढ देणेस व त्यांना प्रत्येकी र.रु.१५,०००/- + वाहतूक भत्ता र.रु.१,३००/- असे एकूण र.रु.१६,३००/- मासिक एकवट मानधन देणेस तसेच त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६६६ विषय क्रमांक - १७

दिनांक – १६/०५/२०१८ विभाग- भूमि जिंदगी

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भुजि/ट्रेसर-८/८७/२०१८ दि.११/०५/२०१८

मा. महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत अपंग कल्याणकारी योजने अंतर्गत अपंगांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. 'झेप पुनर्वसन केंद्र' चिंचवड हि मतिमंद व गतिमंद मुलांसाठी शिक्षण, प्रशिक्षण व विविध प्रकारच्या थेरपी देणारी सामाजिक संस्था असुन या संस्थेने दिनांक ०२/०२/२०१८ च्या पत्रान्वये कै.अंकुश बो-हाडे विद्यालय से.२४ प्राधिकरण निगडी हि इमारत वापरासाठी विनामुल्य मिळणेकामी मागणी केली आहे. तरी या संस्थेने मागणी केलेली जागा भुमि जिंदगी विभागाने प्रस्तावात नमुद मुद्ये करारनाम्यात नमुद करून झेप या संस्थेला ३ वर्षे कालावधीसाठी वापर करणेकामी नाममात्र भाड्याने देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

## सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आलेले विषय घेणेत आले

ठराव क्रमांक - २६६७ विषय क्रमांक - १८
दिनांक – १६/०५/२०१८ विभाग- दूरसंचार विभाग
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ– मा.अतिरिक्त आयुक्त यांचे जावक क्र.दूरसंचार/०१/५०/२०१८ दि.१५/०५/२०१८

मा. अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

वरिष्ठ अधिकारी, विभागप्रमुख, अभियंते व विविध कार्यालये यांस कार्यालयीन कामकाजासाठी 3G/4G डोंगल सुविधा पुरविणेसाठी निविदा मागवून मे.आयडिया कंपनीस तीन वर्षाकरीता कामाचा आदेश देणेत आलेला आहे. सदर कामाची निविदा प्रक्रिया अंतिम होणेसाठी अंदाजे तीन महिन्यांचा कालावधी लागणार असल्याने दि. १९/०५/२०१८ ते १८/०८/२०१८ या तीन महिन्यासाठी किंवा ३ महिन्यांचा आत निविदा अंतिम झाल्यास त्या तारखे पर्यंत सदर कामास मुदवाढ देणेस व येणा-या अंदाजे र.रू.६,४५,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६६८ विषय क्रमांक - १९
दिनांक – १६/०५/२०१८ विभाग- लेखा विभाग
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/५७८१/२०१८ दि.१५/०५/२०१८

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग यांनी दि.१५/०५/२०१८ चे प्रस्तावान्वये सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकातील ब क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाच्या विशेष योजना येथील प्रथम प्राधान्याने करावयाच्या कामासाठी अपुरी तरतुद ठेवण्यात आलेली असल्याने सदर लेखाशिर्षा वरील संभाव्य होणारा खर्च विचारात घेता र.रू.५०,००,०००/- विभागाअंतर्गत वर्गीकरण करणेकामी कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग यांनी दि.१५/०५/२०१८ चे प्रस्तावान्वये सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकातील ब क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाच्या विशेष योजना येथील प्रथम प्राधान्याने करावयाच्या कामासाठी अपुरी तरतुद ठेवण्यात आलेली असल्याने सदर लेखाशिर्षावरील संभाव्य होणारा खर्च विचारात घेता र.रू.५०,००,०००/- विभागाअंतर्गत वर्गीकरण करणेबाबत प्रस्तावित केलेली आहे. वर्गीकरणाचा तपशील पुढील प्रमाणे.

| अ. क्र. | उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | पानांक | अ. क्र. | लेखाशिर्ष | सन २०१८-१९ ची मुळ तरतूद | वाढ करावयाची तरतूद | घट करावयाची तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | विकास प्रधिकरणा हद्दीतील पेठ क्र.३२ येथे वायू प्रदुषण नियंत्रण यंत्रणेसह गॅसवर आधारित आधुनिक शव | ४८९ | १ | स्मशानभूमी | २,००,००,००० | ० | ३०,००,००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | दाहिनीसह स्मशानभूमी विकसीत करणे | | | | | | |
| २. | रावेत सर्वे नं.७५ ते भोंडवे बाग पर्यंतचा (२बी आर टी एस फिडर रूट) १८ मी रूंद रस्ता विकसित करणे. | १८ | ७ | विशेष योजना | १४,००,००,००० | ० | २०,००,००० |
| ३. | प्र.क्र.१६ हद्दीलगत देहूरोड कॉन्टोनमेंट बोर्ड हद्दीतील शितळानगर येथील स्मशानभूमी मद्ये विद्युत/ डिझधेल/ गॅस दाहिनी बसविणे व स्थापत्य विषयक कामे करणे. | ४९ | ६५ | विशेष योजना | ० | ५०,००,००० | ० |
| | एकूण | | | | | ५०,००,००० | ५०,००,००० |

तरी वरीलप्रमाणे कार्यकारी अभियंता स्थापत्य विभाग यांनी प्रस्तावित केलेनुसार र.रु.५०,००,०००/- वर्गीकरण करणेबाबत मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत य़ेत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६६९ विषय क्रमांक - २०

दिनांक – १६/०५/२०१८ विभाग- वाय.सी.एम.एच.

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ– मा.अतिरिक्त आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/७/कावि/३०५/१८ दि.१६/०५/२०१८

मा. अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयामध्ये दरमहा एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात विविध कन्सलटंट पदे सहा महिने कालावधीकरीता भरणेकामी जाहिरात प्रसिध्द करून प्राप्त उमेदवारांचे घेण्यात आलेल्या मुलाखतीमध्ये खालील उमेदवार पात्र झालेले आहेत.

| अ.क्र. | उमेदवारांचे नाव | पदनाम | जात व प्रवर्ग | प्र.महिना मानधन र.रू. |
|---|---|---|---|---|
| १ | घाडगे निता स्कराराव | मेडीकल ऑफीसर बीटीओ | एस.सी | ५५०००/ |
| २ | डॉ. पटेल स्वाती प्रविणचंद्रा | मेडीकल ऑफीसर बीटीओ | खुला | ५५०००/ |
| ३ | डॉ. कुलकर्णी तन्मयी विलास | मेडीकल ऑफीसर बीटीओ | खुला | ६००००/- |
| ४ | डॉ. सदाकाळ ज्योती उत्तम | वैद्यकिय अधिकारी आयसीयु | खुला | ४५०००/- |
| ५ | डॉ. देसले अतुल विलास | वैद्यकिय अधिकारी आयसीयु | खुला | ४५०००/- |
| ६ | डॉ. अहिरे घनश्याम प्रकाश | वैद्यकिय अधिकारी आयसीयु | एस.सी | ४५०००/- |
| ७ | डॉ. वायकोळे पंकज विजयकुमार | सर्जन | खुला | ६००००/- |
| ८ | डॉ. पन्हाळे शिरिषकुमार प्रल्हाद | सर्जन | खुला | ६००००/- |
| ९ | डॉ. कवडे भाऊसाहेब रमेश | इंटेनसिव्हिस्ट | खुला | ६००००/- |
| १० | डॉ. कुंजीर नाना गोकूळ | इंटेनसिव्हिस्ट | खुला | ६००००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | डॉ. पन्हाळे भुपेंद्र प्रल्हाद | आर्थो. | खुला | ६००००/- |
| १२ | डॉ. दिपाली राहुल गायकवाड | उरो रोग तज्ञ | खुला | ६००००/- |

वरील प्रमाणे निवड झालेल्या उमेदवारांना एकत्रित मानधनावर सहा महिनेकरीता नेमणुक करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६७० | विषय क्रमांक - २१
दिनांक – १६/०५/२०१८ | विभाग- अ क्षेत्रिय, पाणीपुरवठा
सूचक – मा.विलास मडिगेरी | अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.अक्षेका/पापु/८/कावि/१९/२०१८ दि.१५/०५/२०१८

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

अ प्रभागांतर्गत उंच पाण्याच्या टाक्यावरून पाणी पुरवठा व्यव्सथापन करणेकरीता मजुर कर्मचारी पुरविणे(२०१६-१७) या कामाचे सुधारित खर्चास व मुदतवाढ निविदा क्रमांक १७/४/२०१६-१७ चे मजुर पुरविणेचे काम मे.बापदेव महाराज स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित यांना ७.६ टक्के कमी या दराने देणेत आलेले आहे. सद्यस्थितीत “अ” क्षेत्रिय कार्यालय पाणीपुरवठा विभागामार्फत निविदा क्र. अन्वये मजुर पुरविणे बाबत निविदा काढणेत आलेली आहे व ती उघडणेत आलेली आहे. सदर कामासाठी प्राप्त दर, बोनस व सेवाकर बाबत विभिन्न मत असल्याने सदरची निविदा स्विकृतीची प्रक्रिया क्लिष्ठ झालेली असल्याने सदरचे कामाची निविदा स्विकृतीस विलंब होणार आहे. पाणीपुरवठा अत्यावश्यक सेवेचा भाग असुन दैनंदिन पाणी पुरवठयाच्या व्हॉल्व्ह चालु बंद करणेसाठी निविदा क्रमांक १७/४/२०१६-१७ चे काम सुधारित करावे लागणार आहे. सदर कामास र.रु.३४,५०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये चौतीस लाख पन्नास हजार फक्त) इतकी प्रशासकिय मान्यता घेणेत आलेली आहे. त्यामुळे सदर निविदा क्रमांक १७/४/२०१६-१७ चे काम सुधारित करावे लागणार आहे. निविदा क्रमांक १७/४/२०१६-१७ च्या एकुण सुधारित खर्च र.रु.३१,७६,७३८/- (वाढीव खर्च र.रु.१०,५८,४०५/- ला मा.स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यामुळे “अ” क्षेत्रिय कार्यालय पाणीपुरवठा विभागाकडील निविदा क्र.१७/४/२०१६-१७ च्या एकुण सुधारित खर्च र.रु.३१,७६,७३८/- (वाढीव खर्च र.रु.१०,५८,४०५/-) ला मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६७१ | विषय क्रमांक - २२
दिनांक – १६/०५/२०१८ | विभाग- फ क्षेत्रिय, पाणी पुरवठा
सूचक – मा.विलास मडिगेरी | अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.फक्षेका/पापु/१/कावि/२८०/२०१८ दि.१६/०५/२०१८

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

कृष्णानगर संप व पंप हाऊस व इतर ठिकठिकाणी व्हॉल्व्ह ऑपरेशनकरिता मजुर कर्मचारी पुरविणे(२०१६-१७) या कामाचे सुधारित खर्चास मान्यता व मुदतवाढ निविदा क्रमांक

१७/८/२०१६-१७ चे मजुर पुरविणेचे काम मे.समिप सर्व्हीसेस यांना ७.५९ टक्के कमी या दराने देणेत आलेले आहे. सद्यस्थितीत फ क्षेत्रिय कार्यालय पाणीपुरवठा विभागामार्फत निविदा क्र.२६/२/२०१७-१८ अन्वये मजुर पुरविणे बाबत निविदा काढणेत आलेली आहे व पहिला लिफाफा उघडणेत आलेला आहे. सदर कामासाठी निविदा स्विकृतीची प्रक्रिया क्लिष्ठ झालेली असल्याने सदरचे कामाची निविदा स्विकृतीस विलंब होणार आहे. पाणीपुरवठा अत्यावश्यक सेवेचा भाग असुन दैनंदिन पाणी पुरवठयाच्या व्हॉल्व्ह चालु बंद करणेसाठी निविदा क्रमांक १७/८/२०१६-१७ चे काम सुधारित अंदाजपत्रक करुन या रक्कमेस व कामास मुदत वाढ घ्यावी लागणार आहे. सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात असलेल्या नविन मजुर पुरवठा करणे या कामासाठी र.रु.२६,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये सव्वीस लाख फक्त ) इतकी प्रशासकिय मान्यता घेणेत आलेली आहे. या कामासाठी तरतुद उपलब्ध नसल्याने नवीन निविदा कामाची कार्यवाही चालु असलेल्या कामातील तरतुदीमधुन तरतुद वर्ग करुन सुधारित अंदाजपत्रक व मुदत वाढीसह मान्यता मिळावी. त्यामुळे सदर निविदा क्रमांक १७/८/२०१६-१७ चे काम सुधारित करावे लागणार आहे. निविदा क्रमांक १७/८/२०१६-१७ च्या एकुण सुधारित खर्च र.रु.१६,७८,९९९/-(वाढीव खर्च र.रु.६,९८,७९६/- धरुन) या रक्कमेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यामुळे फ क्षेत्रिय कार्यालय पाणीपुरवठा विभागाकडील निविदा क्र.१७/८/२०१६-१७ च्या एकुण सुधारित खर्च रक्कम रुपये र.रु.१६,७८,९९९/- (वाढीव खर्च र.रु.६,९८,७९६/-धरुन) या रकमेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६७२ विषय क्रमांक - २३
दिनांक – १६/०५/२०१८
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.राजू मिसाळ
संदर्भ - मा.राजेंद्र गावडे, मा.राजू मिसाळ यांचा प्रस्ताव

कै.मा.ना.यशवंतरावजी चव्हाण स्मारक समिती ही मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० (सन १९५० च्या मुंबई अधिनियम क्र.२९) अन्वये पुणे विभाग, पुणे येथील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालयात नोंदणीकृत संस्था असून या समिती मार्फत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्षेत्रात प्राधिकरण निगडी येथे कै.मा.ना. यशवंतरावजी चव्हाण यांचे भव्य स्मारक, गोर गरिब-अनाथ व अपंगासाठी अभ्यासिका (वस्तीगृह) सांस्कृतिक भवन, ग्रंथालय व वाचनालय, व्यायामशाळा, आयुर्वेदिक उपचार केंद्र इ. बांधणेचे नियोजन असुन सदरचे बांधकाम चालु आहे. सदर बांधकामा करीता र.रू.५ कोटी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत देणगी देणेबाबत कै.मा.ना.यशवंतरावजी चव्हाण स्मारक समितीने विनंती केली आहे. स्व.यशवंतरावजी चव्हाण यांनी पिंपरी चिंचवडसह संपुर्ण महाराषट्रभर राबविलेल्या औद्योगिक धोरणांमुळेच पिंपरी चिंचवडसह संपुर्ण महाराष्ट्रभर छोटे-मोठे उद्योगधंदे सुरू होऊन अल्पावधीतच पिंपरी चिंचवडसह परिसरातील गावांचे रूपांतर मोठ्या औद्यागिक वसाहतींमध्ये झाले. त्यांच्यामुळेच ही नगरी राष्ट्रीयच नव्हेतर आंतरराष्ट्रीय स्तारावरती नावा रूपास आली स्वा.यशवंतरावजी चव्हाण यांनी राबविलेल्या औद्योगिक आणि सहकार धोरणांमुळेच लाखो हातांना रोजगार मिळाला. छोट्या-मोठ्या उद्योगांना चालना मिळाली, व्यापा-यांना व्यापार मिळाला. त्यांचे हेच ऋण फेडण्याचे औचित्य मिळावे तसेच त्यांच्या कार्याची प्रेरणा व स्फूर्ति भावी पिढीतील युवकांना मिळावी म्हणून त्यांचे पिंपरी चिंचवड

महानगरपालिका कार्यक्षेत्रात स्मारक असणे गरजेचे आहे. म्हणूनच कै.मा.ना. यशवंतराव चव्हाण यांचे महापालिका क्षेत्रात भव्य स्मारक उभे रहावे याकरिता महापालिकेमार्फत कै.मा.ना.यशवंतरावजी चव्हाण स्मारक समितीस र.रू.५ कोटी देणगी स्वरूपात देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६७३ विषय क्रमांक - २४

दिनांक – १६/०५/२०१८

सूचक – मा.विलास मेडिगेरी अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ - मा.विलास मेडिगेरी, मा.अमित गावडे यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने जनसंपर्क विभाग, क्रिडा व सांस्कृतिक विभाग व अन्य विभागाकडून महापालिकेचे होणारे विविध कार्यक्रम व भुमिपुजन, उध्दघाटन इ. असे विविध कार्यक्रमासाठी फोर कलर मध्ये निमंत्रण पत्रिका छापले जातात तसेच स्मृतिचिन्ह दिले जाते, तरी याचा खुप मोठ्या प्रमाणात अनावश्यक खर्च होतो असे निदर्शनास आले आहे. या पुढे फोर कलर मध्ये निमंत्रण पत्रिका ही कायमस्वरूपी छापणे बंद करून कॉम्प्युटर द्वारे निमंत्रण पत्रिका बनवून त्याची झेरॉक्स प्रती बनवुन ती वाटण्यात यावी, केंद्रीय मंत्री महोदयांचे उपस्थितीत कार्यक्रम असल्यास अपवादात्मक बाब म्हणून फोर कलर निमंत्रण पत्रिका बनविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६७४ विषय क्रमांक - २५

दिनांक – १६/०५/२०१८ विभाग- अ क्षेत्रिय, स्थापत्य

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ– मा.अतिरिक्त आयुक्त यांचे जावक क्र.अक्षेका/स्था/कावि/५७६/१८ दि.१५/०५/२०१८

मा. अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी भाजीमंडई येथील इमारतीमधील जुने रात्र निवारा केंद्र वाढविणे व देखभाल दुरूस्ती करणे या कामासाठी वास्तुविशारद (Architect) नेमणेकामी दीनदयाळ अंत्योदय योजना – राष्ट्रीय नागरीक उपजिविका अभियान या केंद्र शासन पुरस्कृत नागरी बेघरांना निवारा या घटकांतर्गत पिंपरी चिंचवड मनपाच्या प्रभाग क्र.१९ पिंपरी कॅम्प, वाणिज्य व भाजी मंडई इमारतीमधील जुने रात्र निवारा केंद्र वाढविणे दुरूस्ती करणे प्रस्तावित आहे सदर कामाचा DPR विस्तृत प्रकल्प अहवालास मनपा सभा ठराव क्र.७२ दि. १९/८/२०१७ अन्वये मान्यता देणेत आली आहे. सदरचे नियोजित कामासाठी व त्या अनुषंगाने स्थापत्य विषयक व विद्युत विषयक कामे करणे या कामाचे नियोजन/संकल्प चित्रे, प्रकल्प आराखडे, बांधकाम परवानगी, पुर्वगनपत्रक निविदा इ. तयार करणे करिता तज्ञ वस्तुविशारद(Architect) ची नेमणूक करणे आवश्यक आहे. मनपा पॅनलवरील मे.एस.के.असोसिएटस तर्फे भागीदार श्री. दयानंद शिंदे यांनी सदर कामाचा DPR

(विस्तृत प्रकल्प अहवाल) तयार केला आहे तसेच त्यांना अशा प्रकारच्या कामाचा अनुभव आहे तसेच ते मनपाच्या प्रचलित दरानुसार विषयांकित काम करणेस तयार आहेत. तरी मे. एस.के असोसिएटस तर्फे भागीदार श्री.दयानंद शिंदे यांचे प्रकल्प कामाचा पुर्वानुभव व कौशल्य लक्षात घेता पिंपरी भाजी मंडई इमारतीमधील जुने रात्र निवारा केंद्र वाढविणे व देखभाल दुरूस्ती करणे या प्रकल्पासाठी त्यांची वास्तुविशारद (Architect) म्हणून नेमणेकामी तसेच त्यांचा सदर प्रकारच्या कामाकरिता असलेला अनुभव लक्षात घेता त्यांची प्रस्तुत प्रकल्पासाठी मे. एस.के.असोसिएटस तर्फे भागीदार श्री. दयानंद शिंदे यांना मनपाचे प्रचलित दराप्रमाणे वास्तुविशारद (Architect) म्हणून निविदा रक्कम रूपये ५० लाखाच्या २% फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६७५ | विषय क्रमांक - २६

दिनांक – १६/०५/२०१८ | विभाग- नागरवस्ती विकास योजना

सूचक – मा.विलास मडिगेरी | अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ– मा.अतिरिक्त आयुक्त यांचे जावक क्र.नावियो/४/कावि/१०१/१८ दि.१६/०५/२०१८

मा. अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय व सहकारीता मंत्रालयाच्या सहयोगाने व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने पिंपरी चिंचवड शहरातील दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांच्या मोफत वाटप कार्यक्रमाचे आयोजनाकामी येणा-या खर्चास मान्यता देणेकामी केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय व सहकारीता मंत्रालयाच्या सहयोगाने व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने पिंपरी चिंचवड शहरातील दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांचे मोफत वाटप तसेच राष्ट्रीयकृत बँकाँच्या वतीने मुद्रा लोन बाबत माहिती व अर्ज वाटप करणेत येणार आहे. सदरचा कार्यक्रम साई उद्यान, आकुर्डी या ठिकाणी दि. 25.5.2018 रोजी सकाळी 11.00 ते 4.00 या वेळेत संपन्न होणार आहे. दि. 15.5.2018 रोजी सन्मा. खासदार श्री. अमर साबळे यांच्या समवेत आयुक्त दालनात झालेल्या बैठकीत या कार्यक्रमाचे नियोजन ठरविण्यात आले आहे. त्यानुसार या कार्यक्रमाला केंद्रीय अर्थ राज्यमंत्री, तसेच सन्मा. खासदार अमर साबळे, बँकांचे प्रतिनिधी व ज्यांना मोफत साहित्य वाटप करणेत येणार आहे असे दिव्यांग लाभार्थी उपस्थित रहाणार आहेत. या कार्यक्रमाच्या नियोजनासाठी तसेच उपस्थित सर्वांना भोजन देणे व इतर अनुषंगीक खर्च यासाठी अंदाजे र.रु.4,50,000/- (अक्षरी र.रु.चार लाख पन्नास हजार फक्त) इतका खर्च अपेक्षित आहे. तरी सदरच्या अंदाजे खर्चास किंवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(ममता विनायक गायकवाड)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/३/कावि/६९३/२०१८
दिनांक - १७/०५/२०१८

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/२३७/२०१८ दि. ०२/०५/२०१८ विषय क्र.३ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, झोनिपु स्थापत्य विभाग

( विषयपत्र क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/२३७/२०१८ दिनांक ०२/०५/२०१८ लगत)

प्रपत्र अ ( अ.क्र. ०१ ते ६ )

| अ. क्र | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेची तारीख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेश दिनांक | निविदा रक्कम | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | मे.व्यंकटेश्वरा कंन्स्ट्रक्शन | ०४/०४-१७-१८ | आनंदनगर व साईबाबानगर झोपडपट्टीत स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत सार्वजनिक शौचालयाची कामे करणे. | २८/०२/२०१८ | झोनिपु/स्था/नि/कावि/२२७/२०१८ | ०४/०४/२०१८ | २२४९१६१ | १७% कमी | १८,६६,८०४ |
| ०२ | मे.व्यंकटेश्वरा कंन्स्ट्रक्शन | ०४/१८-१७-१८ | आनंदनगर झोपडपट्टी येथे पेव्हिंग ब्लॉक बसविणे. | २८/०२/२०१८ | झोनिपु/स्था/नि/कावि/२३१/२०१८ | ०४/०४/२०१८ | २२४९७७२ | १७% कमी | १८,६७,३११ |
| ०३ | मे.व्यंकटेश्वरा कंन्स्ट्रक्शन | ३/२१-१७-१८ | हिराबाई लांडगे झोपडपट्टीमध्ये देखभाल व किरकोळ दुरुस्तीची कामे करणे व इतर अनूषांगिक . कामे करणे. | १२/०३/२०१८ | झोनिपु/स्था/नि/कावि/२२८/२०१८ | ०४/०४/२०१८ | १८६५५५१ | १२% कमी | १६,४१,६८५ |
| ०४ | मे.श्रीगणेश कंन्स्ट्रक्शन | ०३/१२-१७-१८ | से.क्र.२२ ओटास्किम येथील इंदिरानगर व संजयनगर परिसरात पावसाचे पाणी वाहून जाणंकरीता स्ट्रॉम लाईन पाईप टाकणे. | १२/०३/२०१८ | झोनिपु/स्था/नि/कावि/२२९/२०१८ | ०४/०४/२०१८ | १८६६५०३ | ११% कमी | १६,६१,१८८ |

पान क्र.२......

प्रपत्र अ पानांक क्र.०२

| अ. क्र | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेची तारीख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेश दिनांक | निविदा रक्कम | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०५ | मे.श्रीगणेश कंन्स्ट्रक्शन | ३/११-१७-१८ | अंजठानगर झोपडपट्टीमध्ये किरकोळ दुरुस्तीची कामे व इतर अनुषांगिक कामे करणे. | १२/०३/२०१८ | झोनिपु/स्था/नि/कावि/२३०/२०१८ | ०४/०४/२०१८ | १३९६९०३ | ११% कमी | १२,४३,२४४ |
| ०६ | मे.श्रीयश कंन्स्ट्रक्शन | ३/२३-१७-१८ | से.क्र.२२ ओटास्किम मधील बौध्दनगर व मिलिंदनगर परिसरात पावसाळी पाणी वाहून जाणेकरीता स्ट्रॉम वॉटर लाईन टाकणे व इतर दुरुस्तीची कामे करणे. | २८/०२/२०१८ | झोनिपु/स्था/नि/कावि/२२६/२०१८ | ०४/०४/२०१८ | १८६४७४२ | १२% कमी | १६४०९७३ |

प्रपत्र क्र. अ अ.क्र.०१ ते ०६

सक्षम प्राधिकारी तथा
सहा.आयुक्त,झोनिपु विभाग.
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८.